# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ९४३०/२०१८

पुणे शहर, दिनांक ११/०९/२०१८

**विषय :- हॉर्न न वाजविता व हॉर्न वाजवीत प्रवास करुन झालेल्या परिणांमाचे निरीक्षण केले बाबत.**

---

पुणे शहर वाहतुक शाखा आणि प्रादेशिक परिवहन विभाग,पुणे यांचे संयुक्त सहभागातातून रस्ता सुरक्षेच्या अनुषंगाने वाहनचालकांमध्ये नो- हॉर्नची जागृती निर्माण होण्यासाठी शहरात दिनांक १२/०९/२०१८ रोजी **नो- हॉर्न डे** उपक्रम करणार आहेत.

सदर उपक्रमाचे अनुषंगाने आज दिनांक- ११/०९/२०१८ रोजी, ध्वनी प्रदुषणाचे अनुषगांने नवीन प्रयोग राबविण्यात आला, त्यामध्ये कोंढवा खडी मशिन चौक,पुणे या ठिकाणापासून आंबेडकरपुतळा चौक,कॅम्प या ठिकाणापर्यंत **दोन ॲक्टिव्हा,दोन मोटार सायकल व दोन कार** पाठविण्यात आले त्यामध्ये दोघांपैकी एकाने सातत्याने हॉर्न वाजवीत व दुस-याने हॉर्न न वाजविता रहदारीतुन जाण्यास सांगितले. शेवटच्या ठिकाणी दोन्ही ॲक्टिव्हा चालक हे १९ मिनीटे ४५ सेकंदात पोहचले, दोन मोटार सायकल मध्ये जो हॉर्न वाजवीत होता तो १६.९ सेकंदात व विना हॉर्नवाला १९.४३ सेकंदात पोहचला, कार मध्ये हॉर्न वाजविणारा २० मिनिटांत पोहचला व विना हॉर्न वाला २५ मिनिटांत पोहचला.

यावरुन दुचाकी स्वारांमध्ये हॉर्न वाजविल्यामुळे सुमारे ३ मिनीटे कारमध्ये ५ मिनीटे अगोदर पोहचले आहेत, परंतु त्यांनी सातत्याने हॉर्न वाजवून ध्वनी प्रदुषण केले आहे. पोहचण्यामध्ये काहीएक मोठा फरक दिसला नाही. बरेच वाहनचालक हे आवश्यकता नसताना हॉर्नचा वापर करत असून त्यामुळे ध्वनी प्रदुर्षणात वाढ होत आहे.सदरचा प्रयोग हा पोलीस उप आयुक्त, वाहतुक, तेजस्वी सातपुते यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.निंबाळकर,कोंढवा वाहतुक विभाग व पोलीस निरीक्षक,नियोजन श्री अनिल पाटील यांनी राबविला आहे.

तरी वाहनचालकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी वाहनचालविताना अनावश्यक हॉर्न वाजवू नये व ध्वनी प्रदुषण करु नये.तसेच दिनांक- १२/०९/२०१८ रोजी नो हॉर्न डे उपक्रमात जास्तीत जास्त नागरीकांनी सहभाग घ्यावा.

| | |
|---|---|
| | जा.क्र./पोउआ/वाह/ ९४०१ /१८ |
| **प्रेसनोट** | पुणे दिनांक - ११ /०९/२०१८ |

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी तेजस्वी सातपुते पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, यापुर्वी या ठिकाणी काही पार्कींग निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - ११ /०९/२०१८ ते दिनांक - २५ /०९/२०१८ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचन व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

## हडपसर वाहतुक विभाग पुणे अंतर्गत.

**शिवाजी चौक केशवनगरकडुन रेणुका माता मंदिर चौक ते बेलेज ब्ल्यु सोसायटी चौक मांजरी रोड पर्यत एकेरी वाहतुक करण्यात येत आहे.**

जा.क्र./पोउआ/वाह/०४०२ /२०१८

**प्रेसनोट**

पुणे, दिनांक - ११ /०९/२०१८

ज्याअर्थी पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी तेजस्वी सातपुते, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, यापुर्वी काही पार्किंग निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - ११ /०९/२०१८ ते दिनांक - २५ /०९/२०१८ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**वारजे वाहतुक विभाग पुणे अंतर्गत,**

**गणपती माथा चौक ते आंबेडकर चौक पर्यत सकाळी ०८.३० ते १०.३० वा व आंबेडकर चौक ते गणपती माथा चौक पर्यत सायंकाळी १७.०० ते २१.०० वा. पर्यत नो पार्किंग करण्यात येत आहे.**